संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# श्रीमंत मुंबईचे गरीब मोजमाप

**मुंबईच्या** गर्भश्रीमंतीपणावर जगाने पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे. न्यू वेल्थ वर्ल्ड या संस्थेतर्फे जगभरातल्या शहरांची श्रीमंती मोजली गेली. त्यात मुंबई ही जगातली चौदावी श्रीमंत महानगरी असल्याचे नोंदवले गेले. विशेष म्हणजे आपण ज्या अमेरिकेला सर्वाधिक श्रीमंत देश मानतो तिथल्या न्यूयॉर्क शहरापेक्षाही लंडनमध्ये सर्वाधिक श्रीमंत लोक राहात असल्याचे मान्य झाले आहे. पहिल्या क्रमांकावर असलेल्या लंडनची संपत्ती ही २.७ लाख कोटी डॉलर्सची आहे. तर दुसऱ्या क्रमांकावरच्या न्यूयॉर्कची २.६ लाख कोटी डॉलर्स इतकी संपत्ती असल्याचे या अहवालाचे म्हणणे आहे. मुंबईकरांकडे ८२० अब्ज डॉलर संपत्ती असल्याचे जाहीर करत असताना या महानगरात ४६ हजार कोट्यधीश आणि २८ अब्जाधीश असल्याचे नोंदले गेले आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचा देशभरात श्रीमंत महानगरी म्हणून पहिला क्रमांक लागला हे अत्यंत स्वाभाविक आहे. परंतु ही श्रीमंती मोजताना कोणते निकष लावले गेले याचा उलगडा झालेला नाही. अर्थातच संबंधित व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत याचा आढावा यानिमित्ताने घेतला गेला असण्याची शक्यता आहे. सव्वा कोटी लोकसंख्येच्या या महानगरीत ४८ हजार कोट्याधीश आणि अठरा अब्जाधीश राहातात. संपत्तीची ही विभागणी जर पाहिली तर किमान एक कोटी २४ लाख मुंबईकरांची आर्थिक स्थिती सर्वसाधारण स्वरूपाची आहे. असा त्याचा अर्थ काढता येऊ शकतो. खरे तर मुंबईतल्या या श्रीमंतीचा आलेख मोजताना जर स्थावर मालमत्ता मोजली गेली असेल तर मुंबईतल्या कोट्याधीशांची संख्या आणखी वीस पंचवीस हजारांनी वाढू शकते. कारण मुंबईतल्या कोणत्याही फ्लॅटची किंमत आज ऐंशी लाखापासून सव्वा कोटीपर्यंत आणि प्रत्यक्ष मुंबई शहरात कोणत्याही चारशे फुटाच्या घराची किंमत सहजपणे एक कोटीच्यावर जाते. सव्वा कोटीपैकी किमान साठ लाख लोक तरी मुंबई शहरातच राहतात. सर्वात दाटीवाटीची वस्ती असलेल्या धारावीसारख्या झोपडपट्टीतसुध्दा जागेचा हा हिशोब लावला तर तिथेसुध्दा किमान पाच पंचवीस कोट्याधीश सहजपणे सापडू शकतील. अर्थात त्याची दुसरीदेखील बाजू आहे. कारण याच सव्वा कोटीच्या लोकसंख्येपैकी पन्नास लाख लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहातात त्यांचे एकूण राहणीमान आणि जीवनमान बघितले तर श्रीमंत मुंबईमध्ये असलेली ही विदारकता दुर्लक्षित करता येत नाही.

### ते श्रीमंत झाले

अर्थातच हा जगाचा आणि एकूणच मानवी मनाचा स्वभाव आहे. सत्ता, पैसा, श्रीमंती याची लवकर मोजदाद होते. किंवा त्याची लवकर दखल घेतली जाते. कारण श्रीमंतीसाठी लावले जाणारे निकष हे खूप स्पष्ट असतात. पैसा आणि मालमत्तेवरून त्याचा अंदाज करता येतो. याठिकाणी त्या संबंधित श्रीमंत व्यक्तीचे उत्पन्न किती आहे याला तसे फारसे महत्त्व राहात नाही. कारण आजच्या क्षणी त्याच्याकडे असलेली मालमत्ताच किंवा बँक बॅलन्सेस त्याची श्रीमंती प्रदर्शित करीत असतो. गरिबीचे तसे नसते. मुळातच गरीबी मोजण्यासाठी कोणत्याही संस्था पुढे येत नाहीत. आणि आल्या तरी त्यांचे गरिबी मोजण्याचे निकष इतके वेगवेगळ्या स्वरूपाचे असतात की त्यांचे त्या निकषांबाबतही एकमत होत नाही अगदी जागतिक बँकेने लावलेला गरिबाचा निकष किंवा भारताच्या अर्थ किंवा श्रममंत्रालयाने गरिबीची केलेली मोजदाद यामध्येदेखील जमीन आसमानाचा फरक पडतो. गेल्याच वर्षी अर्थमंत्रालय आणि नीतीआयोग या दोन्ही सरकारी संस्थांनी गरिबी मोजण्याचे लावलेले निकष भिन्न स्वरूपाचे होते. एका संस्थेने रोज दहा रुपये कमावणाऱ्याला गरीब ठरवले होते. तर नियोजन आयोगाने बत्तीस रुपये रोज कमावणारा गरीब आहे. असा निष्कर्ष काढला होता. ही सगळी तफावत पाहिल्यानंतर गरिबी मोजण्याचा हा प्रकारही गरिबांवरच अन्याय करणारा वाटू लागतो. आणि म्हणूनच मुंबईची श्रीमंती सांगताना मुंबईची गरिबीदेखील त्यासोबत सहजपणे अधोरेखित होत आहे. या सगळ्या श्रीमंत गरिबीची फुटपट्टी लावताना मुंबई हे श्रीमंत शहर आहे. असा सरधोपटही अर्थ काढता येणार नाही. कदाचित ते सर्वाधिक श्रीमंत असलेल्यांचे जगातले चौदाव्या क्रमांकाचे शहर असू शकते. आणि सर्वाधिक श्रीमंत राहणाऱ्यांचे भारतातील ते पहिल्या क्रमांकाचे महानगर ठरू शकते. कारण श्रीमंत आणि गरीब मुंबईची दोघांमधली दरी इतकी मोठी आहे की त्यातून केवळ श्रीमंतीचा थाटमाट सांगून कोणताही हेतू साध्य होत नाही.

### गरीब गरीबच राहिले

ज्यावेळेला सर्वाधिक श्रीमंत राहणारे देशातील क्रमांक एकच शहर म्हणून मुंबईचा गौरव करतो. त्याचवेळेला ही श्रीमंती कशामुळे आहे याचा शोध घेणेसुध्दा क्रमप्राप्त ठरते. आज सगळ्या जगाला किंवा देशाला जो नियम लागू होतो तोच मुंबईलाही लावावा लागेल. ज्याप्रमाणे देशातील सगळ्या बँकांच्या कर्जापैकी दहा टक्के लोकांकडे बँकांचा सर्वाधिक पैसा आहे असा निष्कर्ष काढला जातो. त्याचप्रमाणे या ४७ हजार कोट्यधीशांकडे मुंबईतल्या ८० हजार गरिबांची संपत्ती एकवटलेली आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. कोणाला तरी गरीब ठरवूनच श्रीमंतीचे मोजमाप होईल. आणि गरीब गरीब राहतो याचा अर्थ त्याला श्रीमंत होण्याची संधीच दिली जात नाही. ती नाकारली जाते. श्रमाचा कष्टाचा मोबदलादेखील त्याला मिळू दिला जात नाही. अशा एका छुप्या शोषणातून श्रीमंतांची श्रीमंती सतत वाढताना दिसून येते. यावरून मुंबईच्या श्रीमंतीचे वर्णन एकांगी ठरते. तो अभिमानाचा विषय ठरत नाही जर सव्वा कोटी लोकसंख्येत किमान तीस पस्तीस लाख लोक कोट्यधीश असते तर एकवेळेला तो मुंबईच्या श्रीमंतीच्या अभिमानाचा विषय ठरला असता. परंतु केवळ ४८ हजार कोट्यधीश आणि २८ अब्जाधीश ही काही अभिमान वाटावी अशा श्रीमंतीची लक्षणे नाहीत. परंपरेने किंवा घराणेशाहीप्रमाणे असलेली श्रीमंती आणि त्यात नव्याने जोडले गेलेले काही श्रीमंत एवढ्यापुरतीच ती बेरीज मर्यादित राहते. श्रीमंत मुंबईचे गरीब स्वरूपाचे हे मोजमाप नक्कीच अर्धवट ठरते.